REVIEW OF RESEARCH

# “अहमदनगर जिल्हयाच्या राजकारणात सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक क्षेत्रातील रचनात्मक विकासातील राजकीय पक्षांची भूमिका”

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019




डॉ. कैलास बाबूराव सोनवणे[1] , प्रा. एकनाथ सिताराम निर्मळ[2]

[1]मार्गदर्शक , संशोधन केंद्रः राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे .
[2]संशोधक विद्यार्थी, संशोधन केंद्रः राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे .

## प्रस्तावना

अहमदनगर जिल्हयाचा इतिहास पाहता स्वातंत्र्यानंतर झालेल्या विविध निवडणुकांतून जिल्हयाच्या राजकारणाची सुरुवात झालेली दिसते. लोकशाहीच्या मार्गाने झालेल्या सार्वत्रिक निवडणुका व त्यामधून विविध राजकीय पक्षातून निवडून गेलेले नेतृत्व आणि या नेतृत्वाने दिलेल्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक योगदानामुळे जिल्हयाच्या एकूण विकासाचा अभ्यास होणे ऐतिहासिकदृष्टया महत्वाचे ठरते. त्यादृष्टीने 1978 ते 2014 झालेल्या लोकसभा आणि विधानसभा तसेच स्थानिकस्वराज्य संस्था आणि सहकारी तत्वावरील विविध संस्थाच्या निवडणुकीतील राजकीय पक्षांनी अहमदनगर जिल्हयाच्या राजकारणाच्या माध्यमातून केलेली कामगीरी चिकित्सकरित्या अभ्यासण्याचा अभ्यासकाचा प्रयत्न आहे. या कालावधीत विविध मतदारसंघातून निवडून गेलेले आमदार, खासदार, स्थानिक स्वराज्य संस्थेतील अध्यक्ष, सदस्य, तसेच सहकारी संस्थाचे संचालक मंडळ यांची अहमदनगर जिल्हाच्या राजकारणात सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक क्षेत्रातील रचनात्मक कामगीरी आणि विकासातील राजकीय पक्षांची भूमिका कशी राहिली आहे याचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेतला आहे.

## राजकीय पक्ष व राजकीय योगदान

अहमदनगर जिल्हयात अकोले, कर्जत, जामखेड, श्रीगोंदा, राहुरी, पाथर्डी, नेवासा, शेवगाव, संगमनेर, राहाता, कोपरगाव, श्रीरामपूर, नगर व पारनेर असे एकूण 14 तालुके आहेत. राजकीय दृष्टीने दक्षिण आणि उत्तर अशा लोकसभेच्या दोन आणि विधानभेच्या तेरा मतदारसंघात विभागला गेलेला हा जिल्हा आहे. महाराष्ट्रातील भौगोलिकदृष्टया सर्वात मोठा जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्हयाने सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि राजकीय बावतीत महाराष्ट्राच्या राजकारणावर आणि समाजकारणावर आपला ठसा उमटविलेला आहे. अहमदनगर जिल्हयाच्या राजकारणाला स्वातंत्र्यापूर्वीपासून असलेला इतिहास पाहता येथील राजकारण आणि राजकीय पक्ष यांचा ऐतिहासिक संबंध लक्षात घ्यावा लागतो. त्यासाठी राजकीय पक्षांचा राष्ट्रीय आणि प्रादेशिक अशा स्वरूपाचा विचार करावा लागतो. त्या अनुषंगाने अहमदनगर जिल्हयाच्या राजकारणाचा अभ्यास करताना महाराष्ट्राच्या राजकीय प्रकियेला प्रभावीत करणाऱ्या राजकीय पक्षांचा अभ्यास देखील महत्वाचा ठरतो. जिल्हयातील नेत्यांचा व राजकीय पक्षांचा स्वातंत्र्योत्तर काळातील उदय व विकास आणि या सर्वांचा सन 1977 पासून ते सन 2015 पर्यंत अहमदनगर जिल्हयाच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच आर्थिक क्षेत्रावरील प्रभावाचा अभ्यास करण्यासाठी प्रत्येक खासदार आणि आमदार यांची व त्यांच्या पक्षाची आपल्या मतदारसंघानुसार राजकीय क्षेत्रात कामगीरी कशी राहिली आहे, याचा तपशीलाने आढावा घेतला आहे.

## राजकीय परिस्थिती व निवडणुका 1977 ते 2014

स्वातंत्र्योत्तर काळात 1977 ते 2014 या कालखंडात देशात लोकसभा व विधानसभेच्या एकूण 10 सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या आहेत. या निवडणुकांमध्ये देशातील विविध राज्य व प्रांतामधून राष्ट्रीयपक्षाबरोबर स्थानिक पक्षांनी सुद्धा या निवडणुकांमध्ये सहभाग घेतला होता.

परंतु या निवडणुकांमध्ये काही अपवाद सोडले तर अधिकाधिक वेळेस कॉंग्रेस पक्षाला यश मिळालेले दिसते. अहमदनगर जिल्हयाच्या बाबतीत तर एकेकाळचा कॉंग्रेसचा बालेकिल्ला अशीच ओळख निर्माण झाली होती. त्यामुळे या काळात कॉंग्रेसच्या नेत्यांना या मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी फारसे कष्ट घ्यावे लागत नसत. **1977** ची जनता आघाडी, **1989** ची संयुक्त आघाडी व **1995** ची राष्ट्रीय आघाडी यांचा जेमतेम **8** ते **9** वर्षाचा अपवाद सोडता बाकी काळात कॉंग्रेसने दीर्घकाळ सत्ता उपभोगलेली दिसते. त्यामुळे महाराष्ट्र राज्याच्या राजकारणा बरोबरच अहमदनगर जिल्हयाच्या राजकारणावर देखील कॉंग्रेस पक्षाचेच वर्चस्व या काळात राहिलेले दिसते. या काळातील राजकीय घडामोडींचे पडसाद जिल्हयाच्या राजकारणात उमटल्याने त्याचे परिणाम लोकसभा व विधानसभा निवडणुकांवर झालेले दिसतात.

## 1980 ची लोकसभा निवडणूक

या निवडणुकीत कॉंग्रेस आयचे श्री.आठरे चंद्रभान हे **260459** मते मिळवून निवडून आले. त्यांना एकूण **63.50** मते मिळाली. त्यांनी कॉंग्रेस यु. च्या निंबाळकर एकनाथ बुवासाहेब यांचा पराभव केला. त्यांना **80245** इतकी द्वितीय पसंतीची मते मिळाली. त्यांच्या खालोखाल झारकर राजाराम मुरलीधर यांना मते मिळाली, ते तृतीय स्थानावर राहिले. त्यांनी जनता पक्षामार्फत निवडणूक लढवली होती.या भागातून कॉंग्रेस पक्ष आघाडीवर राहिला.

या निवडणुकीत कॉंग्रेस आयचे श्री.विखे एकनाथ विठ्ठलराव हे **281221** मते मिळवून निवडून आले. त्यांना एकूण **67.36** शेकडा मते मिळाली. त्यांनी कॉंग्रेस यु. च्या शिंदे आण्णासाहेब पांडुरंग यांचा पराभव केला. त्यांना **121382** इतकी द्वितीय पसंतीची मते मिळाली. त्यांच्या खालोखाल शिंदे अंबादास गंगाधर यांना मते मिळाली. ते तृतीय स्थानावर राहिले. या भागातून कॉंग्रेस पक्ष आघाडीवर राहिला.

## 1984 ची लोकसभा निवडणूक

या निवडणुकीत कॉंग्रेस आयचे श्री.गडाख यशवंतराव क. हे **281873** मते मिळवून निवडून आले. त्यांना एकूण **58.79** शेकडा मते मिळाली. त्यांनी जनता पक्षाच्या ढाकणे बबनराव दादा यांचा पराभव केला. त्यांना **181550** इतकी द्वितीय पसंतीची मते मिळाली. त्यांच्या खालोखाल आढाव बाकचंद भाऊ यांना मते मिळाली. ते तृतीय स्थानावर राहिले. त्यांनी अपक्ष निवडणूक लढवली होती.या भागातून कॉंग्रेस पक्ष आघाडीवर राहिला.

या निवडणुकीत कॉंग्रेस आयचे श्री विखे एकनाथ विठ्ठलराव हे **217982** मते मिळवून निवडून आले. त्यांना एकूण **57.60** शेकडा मते मिळाली. त्यांनी भाकपच्या च्या गायकवाड माधवराव बयाजी यांचा पराभव केला. त्यांना **146497** इतकी द्वितीय पसंतीची मते मिळाली. त्यांच्या खालोखाल डोखे रंजित यादव यांना मते मिळाली. ते तृतीय स्थानावर राहिले. त्यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवली होती.या भागातून कॉंग्रेस पक्ष आघाडीवर राहिला.

## 1989 ची लोकसभा निवडणूक

या निवडणुकीत कॉंग्रेस आयचे श्री.गडाख यशवंत क. हे **297209** मते मिळवून निवडून आले. त्यांना एकूण **58.08** शेकडा मते मिळाली. त्यांनी भाजपाच्या फरांदे ना.स. यांचा पराभव केला. त्यांना **143464** इतकी द्वितीय पसंतीची मते मिळाली. त्यांच्या खालोखाल सप्तश्री के.जी. यांना मते मिळाली. ते तृतीय स्थानावर राहिले. त्यांनी जनता पक्षा मार्फत निवडणूक लढवली होती.या भागातून कॉंग्रेस पक्ष आघाडीवर राहिला.

या निवडणुकीत कॉंग्रेस आयचे श्री.विखे एकनाथ विठ्ठलराव हे **248106** मते मिळवून निवडून आले. त्यांना एकूण **49.76** शेकडा मते मिळाली. त्यांनी भाजपा च्या गुंजाळ व्ही.एस. यांचा पराभव केला. त्यांना **127048** इतकी द्वितीय पसंतीची मते मिळाली. त्यांच्या खालोखाल कडू अे.पी. यांना मते मिळाली ते तृतीय स्थानावर राहिले. त्यांनी भाकप या पक्षा मार्फत निवडणूक लढवली होती.या भागातून कॉंग्रेस पक्ष आघाडीवर राहिला.

## 1991 ची लोकसभा निवडणूक

या निवडणुकीत कॉंग्रेस आयचे श्री.गडाख यशवंतराव हे **279520** मते मिळवून निवडून आले. त्यांना एकूण **46.41** शेकडा मते मिळाली. त्यांनी अपक्ष असलेले विखे इ.व्ही. यांचा पराभव केला. त्यांना **267883** इतकी द्वितीय पसंतीची मते

मिळाली. त्यांच्या खालोखाल झारकर रामभाऊ यांना मते मिळाली. ते तृतीय स्थानावर राहिले. त्यांनी भाजप या पक्षा मार्फत निवडणूक लढवली होती.या भागातून कॉंग्रेस पक्ष आघाडीवर राहिला.

या निवडणुकीत कॉंग्रेस आयचे श्री.शंकरराव काळे हे **311367** मते मिळवून निवडून आले. त्यांना एकूण **63.40** शेकडा मते मिळाली. त्यांनी भाजपचे गुंजाळ व्ही.एस. यांचा पराभव केला. त्यांना **138110** इतकी द्वितीय पसंतीची मते मिळाली. त्यांच्या खालोखाल ठुबे बी.अे. यांना मते मिळाली. ते तृतीय स्थानावर राहिले. त्यांनी माकप या पक्षा मार्फत निवडणूक लढवली होती.या भागातून कॉंग्रेस पक्ष आघाडीवर राहिला.

## 1996 ची लोकसभा निवडणूक

या निवडणुकीत कॉंग्रेस आयचे श्री.शेळके दादा पाटील हे **212751** मते मिळवून निवडून आले. त्यांना एकूण **38.40** शेकडा मते मिळाली. त्यांनी सेनेचे चावस डी.पी. यांचा पराभव केला. त्यांना **163342** इतकी द्वितीय पसंतीची मते मिळाली. त्यांच्या खालोखाल गडाख टी.जी. यांना मते मिळाली. ते तृतीय स्थानावर राहिले. त्यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवली होती.या भागातून कॉंग्रेस पक्ष आघाडीवर राहिला.

या निवडणुकीत भाजपाचे श्री.बडदे भिमराव हे **243543** मते मिळवून निवडून आले. त्यांना एकूण **47.81** शेकडा मते मिळाली. त्यांनी पहिल्यांदाच कॉंग्रेसचे शंकरराव काळे यांचा पराभव केला. त्यांना **223292** इतकी द्वितीय पसंतीची मते मिळाली. त्यांच्या खालोखाल गाडे एम ऐ. यांना मते मिळाली. ते तृतीय स्थानावर राहिले. त्यांनी जनता दला मार्फत निवडणूक लढवली होती.या भागातून भाजप हा पक्ष पहिल्यांदाच आघाडीवर राहिला.

## संदर्भ


1. व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास 1996,‘महाराष्ट्रातील सत्तांतर’, ग्रंथाली प्रकाशन मुंबई
2. मोरे विठ्ठल व सोलापुरे राजशेखर (2010), ‘महाराष्ट्र शासन आणि राजकारण’, अरूणा प्रकाशन औसा, पृ. 240
3. पाटील राजेंद्र (1997), ‘रिपब्लिकन पार्टी काल आणि आज’, अजय प्रकाशन नागपूर पृ.26
4. पळशिकर सुहास व कुलकर्णी सुहास (2008), ‘महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष राजकीय पक्षाची वाटचाल’, समकालीन प्रकाशन पुणे पृ.165
5. घोटाळे विवेक (2005), ‘महाराष्ट्रातील आघाडयाचे राजकारण’, एम फिल अप्रकाशित शोध प्रवंध, राज्यशास्त्र विभाग पुणे पृ.53
6. फडणीस जगन (1978), ‘शेतकरी कामगार पक्षाचे राजकारण’, अजव प्रकाशन कोल्हापूर पृ.23.